# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
दूरध्वनी क्र. २४२६६७००, २४२६१८५६, २४२६४६९९

## दूरशिक्षण विद्याशाखा

# अभ्यासक्रम

# एम. ए. मराठी

# अभ्यासक्रमाचे सर्वसाधारण स्वरूप

**कालावधी** - २ वर्षे **एकूण प्रश्नपत्रिका - ८** (प्रति वर्षी ४)

**गुण** - प्रति प्रश्नपत्रिका १०० गुण, **एकूण गुण - ८००**

**विशेष सूचना - विद्यापीठाच्या नियमानुसार दर वर्षी प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग १ व २ पैकी त्या वर्षी चालू असलेल्या भागासच प्रवेश घ्यावयाचा आहे. उदा.**

| | **प्रवेशाचे वर्ष (प्रथम व द्वितीय या दोन्ही वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी)** |
|---|---|
| **भाग १** | २०११-२०१२, २०१३-२०१४, २०१५-१६ इ. |
| **भाग २** | २०१२-२०१३, २०१४-२०१५, २०१६-१७ इ. |

- मार्गदर्शनपर अध्ययन साहित्य उपलब्ध
- पुणे येथे जानेवारी महिन्याच्या सुमारास संपर्कसत्रातून अध्यापन

**परीक्षेसंबंधी नियम व सूचना -**

- **प्रश्नपत्रिकाचे स्वरूप-**

**एकूण गुण -** १००, अवधी - ३ तास

**एकूण प्रश्न -** ५, प्रत्येक प्रश्नास अंतर्गत पर्याय

प्रश्न १ - दीर्घोत्तरी प्रश्न अ) किंवा ब) प्रश्न २ - दीर्घोत्तरी प्रश्न अ) किंवा ब)

प्रश्न ३ - दीर्घोत्तरी प्रश्न अ) किंवा ब) प्रश्न ४ - दीर्घोत्तरी प्रश्न अ) किंवा ब)★

प्रश्न ५ - टिपा लिहा (चारपैकी कोणत्याही दोन)

(★ज्या विषयांमध्ये संदर्भासह स्पष्टीकरण या स्वरुपाचे प्रश्न अपेक्षित असतील त्या विषयांच्या प्रश्नपत्रिकेमध्ये चौथा प्रश्न संदर्भासह स्पष्टीकरणाचा असेल आणि चार उपप्रश्नांपैकी कोणतेही दोन उपप्रश्न सोडविणे अपेक्षित असेल.)

- **परीक्षेसंबंधी नियम -**

**परीक्षा पद्धती** - वार्षिक

**अंदाजे कालावधी** - मे महिना

**उत्तीर्णतेसाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान आवश्यक गुण** - १०० पैकी ४०

**ATKT** - प्रथम वर्षाच्या परीक्षेत अनुत्तीर्ण वा अनुपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षास प्रवेश घेता येतो.

**श्रेणी व्यवस्था -**

- ४०% ते ४९.९९% - तृतीय श्रेणी
- ५०% ते ५४.९९% द्वितीय श्रेणी
- ५५% ते ५९.९९% - उच्च द्वितीय श्रेणी
- ६०% ते ६९.९९% - प्रथम श्रेणी
- ७०% पासून पुढे - विशेष प्रावीण्य

# एम. ए. मराठी

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने दूरशिक्षण विद्याशाखेअंतर्गत एम्. ए. मराठी अभ्यासक्रम सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेला आहे. मराठी विषयाच्या सखोल व सविस्तर अध्ययन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम सादर करण्यास आम्हास विशेष आनंद होत आहे.

**विभागप्रमुख**

# अभ्यासक्रमाचा आराखडा

## एम. ए. भाग १

१. अभ्यासक्रम पत्रिका १ : विशेष ग्रंथकार अभ्यास (M-101)

२. अभ्यासक्रम पत्रिका २ : प्राचीन गद्य पद्य (M-102)

३. अभ्यासक्रम पत्रिका ३ : ऐतिहासिक व वर्णनात्मक भाषा विज्ञान (M-103)

४. अभ्यासक्रम पत्रिका ४ : भारतीय साहित्यशास्त्र (M-104)

## एम. ए. भाग २

५. अभ्यासक्रम पत्रिका ५ : साहित्य समीक्षा (M-201)

६. अभ्यासक्रम पत्रिका ६ : आधुनिक गद्य-पद्य (M-202)

७. अभ्यासक्रम पत्रिका ७ : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास (M-203)

८. ★ अभ्यासक्रम पत्रिका ८ : ग्रामीण साहित्य (M-204)

दलित साहित्य (M-205)

लोकसाहित्य (M-206)

★ **टीप - सध्या केवळ 'ग्रामीण साहित्य' हा पर्याय उपलब्ध.**

# एम. ए. (मराठी)
# विस्तारित अभ्यासक्रम

**उद्दिष्टे :**

१) मराठी साहित्याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण करणे.

२) मराठी साहित्याबाबतची अस्मिता जागृत करणे.

३) मराठी साहित्याच्या आकलनाची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

४) मराठीतील प्राचीन/ मध्ययुगीन व आधुनिक साहित्यकृतींचा परिचय करून देणे.

५) मराठीतील महत्त्वपूर्ण निवडक साहित्यिकांचे व्यक्तित्व व साहित्य यांचा परिचय करून देऊन विद्यार्थ्यांमधील सृजनतेला चालना देणे.

६) मराठी भाषेच्या अनुषंगाने भाषाविज्ञानाची तसेच साहित्यशास्त्राची ओळख करून देणे.

७) साहित्य समीक्षेच्या विविध अंगांचा, त्यातील विविध प्रवाहांचा व निवडक समीक्षकांचा परिचय करून देणे आणि त्याद्वारे साहित्याबाबतची आस्वादक व समीक्षक दृष्टी विकसित करणे.

## भाग - १

**विशेष ग्रंथकार अभ्यास : अर्वाचीन - व्यंकटेश माडगूळकर (M-101) गुण : १००**

**उद्दिष्टे :**

१) नेमलेल्या ग्रंथकाराच्या साहित्यकृतींचा अभ्यास, त्याच्या प्रतिभेचे स्वरूप, त्याचे संबंधित वाङ्मयप्रकाराला असणारे योगदान व त्याचे मराठी साहित्यविश्वातील स्थान निश्चित करताना ज्या अभ्यासपद्धतींचा वापर करावा लागतो; त्यांचा नेमलेल्या एका विशिष्ट लेखकाच्या अध्ययनातून परिचय व्हावा यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

२) लेखकाचे लौकिक चरित्र, तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय पार्श्वभूमी जाणून घेणे तसेच तत्कालीन वाङ्मयीन वातावरणाची ओळख करून घेणे.

३) लेखकाला लाभलेली वाङ्मयीन परंपरा अभ्यासून तिच्यामधून त्याने नेमके काय घेतले, त्याच्या साहित्यावर त्याचा काय परिणाम झाला, समकालीन साहित्यपरंपरेला त्याने कोणते नवे वळण दिले.

४) वाङ्मयीन परंपरेतील प्रस्तुत ग्रंथकाराचे स्थान व महत्त्व अधोरेखित करणे.

**अभ्यासक्रम : व्यंकटेश माडगूळकर**

लेखकाचे लौकिक चरित्र, 'माणदेशी माणसं', 'ओझं', 'बनगरवाडी', 'करुणाष्टक', 'सत्तांतर', 'प्रवास एका लेखकाचा' येथे लेखकाचा समग्र अभ्यास (त्याच्या चरित्रासह) अभिप्रेत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) व्यंकटेश माडगूळकर : व्यक्ती आणि कलावंत - संपा. म. द. हातकलंगणेकर

२) व्यंकटेश माडगूळकर यांची कोवळे दिवस, चित्रे आणि चरित्र, नागझिरा इ. अन्य पुस्तकेही वाचावीत अशी अपेक्षा आहे.

## प्राचीन गद्य-पद्य (M-102) गुण १००

### अ) लीळाचरित्र

**उद्दिष्टे :**

१) 'लीळाचरित्र' (एकांक)च्या माध्यमातून श्री चक्रधरस्वामींच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष जाणून घेणे.

२) श्री चक्रधरस्वामींच्या/'लीळाचरित्र' निर्मितीच्या काळातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थिती समजावून घेणे.

३) 'लीळाचरित्र' एकांकातील तत्त्वज्ञानाचा परिचय करून घेणे व या साहित्यकृतीचे वाङ्‌मयीन विशेष नोंदविणे.

**अभ्यासक्रम :**

'लीळाचरित्र' (एकांक) - संपादक - शं. गो. तुळपुळे (सुविचार प्रकाशन मंडळ)

### आ) भक्तिगंगेच्या वाटेवर

**उद्दिष्टे :**

१) भक्तिकाव्याचे विशेष समजावून घेणे.

२) 'भक्तिगंगेच्या वाटेवर' या रचनेचे वाङ्‌मयीन सौंदर्य स्पष्ट करणे.

**अभ्यासक्रम :**

'भक्तिगंगेच्या वाटेवर' - संपादक हे. वि. इनामदार, विलास खोले (संजय प्रकाशन)

### इ) केकावली

**उद्दिष्टे :**

१) पंडिती काव्याची वैशिष्ट्ये समजावून घेणे.

२) मोरोपंतांच्या लेखनशैलीचे वेगळेपण सांगणे.

**अभ्यासक्रम :**

केकावली - संपादक प्रा. मा. ना. आचार्य (मानसन्मान प्रकाशन)

### ई) आज्ञापत्र

**उद्दिष्टे :**

१) आज्ञापत्राची वाङ्‌मयीन वैशिष्ट्ये विशद करणे.

२) आज्ञापत्रातून दिसणारे शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेणे.

**अभ्यासक्रम :**

'आज्ञापत्र' - संपा. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन

**संदर्भ ग्रंथ**

वरील सर्व पुस्तकांना विस्तृत प्रस्तावना आहेत. याखेरीज वि. ल. भावे, अ. ना. देशपांडे, ल. रा. पांगारकर, रा. श्री. जोग यांनी संपादित केलेले 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' संदर्भग्रंथ म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यासावेत.

## ऐतिहासिक व वर्णनात्मक भाषाविज्ञान (M-103) गुण १००

**उद्दिष्टे :**

१) भाषाविज्ञान या अभ्यासक्षेत्राचे स्वरूप समजावून घेणे. व्याकरणापेक्षा त्याचे असलेले वेगळेपण लक्षात घेणे.

२) ऐतिहासिक व भाषाविज्ञानपद्धतीनुसार मराठी भाषेची जडणघडण व उत्पत्ती यांचा विस्तारपूर्वक अभ्यास करणे.

३) वर्णनात्मक भाषाविज्ञानांतर्गत स्वनिमविन्यास, पदिमविन्यास व वाक्यविन्यास या अंगांच्या अनुषंगाने मराठी भाषेची रूपव्यवस्था समजावून घेणे.

४) अर्थविन्यासविचाराची पाहणी करणे, भाषिक परिवर्तनाची विविध कारणे व परिणाम यांची नोंद करणे. बोली व प्रमाणभाषा यांचे स्वरूप व परस्परसंबंध अभ्यासणे.

**अभ्यासक्रम :**

१) भाषेची उद्दिष्टे व अभ्यासपद्धती

२) ऐतिहासिक व वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप, त्यामधील साम्य-भेद, सोस्यूर, ब्लूमफिल्ड व चॉम्स्की यांनी मांडलेल्या संकल्पनांचा परिचय.

३) भाषाकुलाची संकल्पना व विविध भाषाकुलांची ओळख

४) मराठीचे कालिक भेद, यादवकाल, बहामनीकाल, पेशवेकाल व अव्वल इंग्रजी काळ.

५) मराठीची उत्पत्ती व त्यासंबंधीची मतमतांतरे

६) स्वनिमविन्यास

७) पदिमविन्यास

८) मराठीचा अर्थविचार

९) आदान संकल्पना

१०) भाषिक परिवर्तन

११) प्रमाण व बोली परस्परसंबंध

**संदर्भग्रंथः**

१) ‘भाषाविज्ञान - वर्णनात्मक आणि ऐतिहासिक - संपा. डॉ. स. गं. मालशे, डॉ. हे. वि. इनामदार व डॉ. अंजली सोमण, आवृत्ती दुसरी. संजय प्रकाशन, पुणे, १९८७.

२) ‘ध्वनी-विचार’ - ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

३) ‘यादवकालीन मराठी भाषा’ - शं. गो. तुळपुळे

४) ‘मराठी भाषा : उद्‌गम आणि विकास’ - कृ. पां. कुलकर्णी

५) ‘वर्णनात्मक भाषाविज्ञान - स्वरूप आणि पद्धती’ - संपा. अंजली सोमण, कल्याण काळे

६) ‘अर्वाचीन मराठी’ - डॉ. रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

**भारतीय साहित्यशास्त्र (M-104)** **गुण - १००**

**उद्दिष्टे :**

१) काव्याची लक्षणे, काव्याचे आत्मतत्त्व आणि काव्यप्रयोजन यांविषयी भारतीय साहित्यशास्त्रात मांडलेली भूमिका अभ्यासणे.

२) काव्यनिर्मितीची प्रक्रिया, काव्यनिर्मितीची कारणे आणि शब्दांच्या वेगवेगळ्या शक्ती व त्यांचे कार्य समजावून घेणे.

३) काव्यानंदविषयक विविध मतप्रणालींचा परिचय करून घेणे आणि त्यांचा चिकित्सापूर्वक सखोल अभ्यास करणे.

**अभ्यासक्रम :**

१) काव्यलक्षण

२) काव्यप्रयोजन

३) काव्यकारण

४) शब्दशक्तीविचार - अभिधा, लक्षणा व व्यंजना

५) रीती व गुणविचार

६) ध्वनिविचार

७) रसविचार - भरताचे रससूत्र, रससंख्या, रसविघ्ने, रसनिष्पत्तीच्या विविध उत्पत्ती

८) काव्यानंदमीमांसा

९) करुणरसविचार

**संदर्भग्रंथ :**

१) ‘अभिनव काव्यप्रकाश’ - रा. श्री. जोग

२) ‘भारतीय साहित्यशास्त्र’ - ग. त्र्यं. देशपांडे, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

३) ‘प्राचीन काव्यशास्त्र’ - र. पं. कंगले

४) ‘काव्यशास्त्रप्रदीप’ - स. रा. गाडगीळ

# <u>भाग - २</u>

**साहित्यसमीक्षा (M-201)** **गुण : १००**

**उद्दिष्टे :**

१) ‘समीक्षा’, ‘टीका’, ‘भाष्य’ व ‘नोंद’ इत्यादींमधील फरक स्पष्ट करणे.

२) समीक्षा : शब्दाचा अर्थ, त्यामागील संकल्पना स्पष्ट करणे

३) समीक्षेचे स्वरूप, प्रयोजन आणि कार्य यांचा अभ्यास करणे.

४) विविध समीक्षापद्धतींचा - प्रकारांचा अभ्यास करणे

५) तात्त्विक व उपयोजित अशा दोन्ही दृष्टीने समीक्षापद्धती व संप्रदाय यांचा अभ्यास करता येणे.

**अभ्यासक्रम :**

१) ललित साहित्याचे स्वरूप व प्रयोजन

२) साहित्य समीक्षेचे स्वरूप व कार्य

३) विविध समीक्षा पद्धतींचा अभ्यास :

- समाजशास्त्रीय समीक्षा पद्धत
- मानसशास्त्रीय समीक्षा पद्धत
- आस्वादक समीक्षा
- स्त्रीवादी समीक्षा
- शैली वैज्ञानिक समीक्षा पद्धती

४) निवडक समीक्षकांचा अभ्यास : वा. म. जोशी, रा. श्री. जोग, ना. सी. फडके, कुसुमावती देशपांडे, गंगाधर गाडगीळ, माधव आचवल

५) साहित्याची भाषा

६) समीक्षकाचे व्यक्तिमत्त्व

**संदर्भग्रंथ :**


१) ‘साहित्यसमीक्षा’ - वा. ल. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२) ‘साहित्यवेध’ - के. रं. शिरवाडकर

३) ‘साहित्यसिद्धांत’ - (वेलेक ॲण्ड वॉरेन) अनु. स. गं. मालशे

४) ‘समीक्षेतील नव्या संकल्पना’ - संपा. मनोहर जाधव

५) ‘साहित्यातील संप्रदाय’ - रा. शं. वाळिंबे

६) ‘टिकाविवेक’ - श्री. के. क्षीरसागर

७) ‘समीक्षा संज्ञाकोश’ - संपा. वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर इ. ग.रा.भटकळ फाऊंडेशन, मुंबई, २००१.

८) ‘समीक्षा संज्ञा’ - संपा. विजया राजाध्यक्ष म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई

## आधुनिक गद्य-पद्य (M-202) गुण : १००

**उद्दिष्टे :**

१) साहित्यकृतींचा सूक्ष्म अभ्यास करणे, यामध्ये संबंधित साहित्यप्रकार, त्या साहित्यकृतीच्या लेखनाची मराठीतील परंपरा, संबंधित साहित्यकृतींचे विश्लेषण, अर्थनिर्णयन आणि मूल्यांकन हे सर्व घटक समाविष्ट आहेत.

२) संबंधित साहित्यकृतींच्या प्रतिमासृष्टीचा व भाषाशैलीचा अभ्यास करणे.

**अभ्यासक्रम :**

१) अंधारवाटा (कादंबरी) ले. सुभाष भेंडे

२) आगरकर लेखसंग्रह (वैचारिक गद्य) संपादक - ग. प्र. प्रधान

३) कुसुमाग्रजांचे प्रवासी पक्षी (संबंधित काव्यसंग्रह) संपादक - शं. का. वैद्य

४) पावसाआधीचा पाऊस (ललित गद्य) शांता शेळके

**संदर्भ ग्रंथ :**

या पुस्तकांना संपादकांनी विस्तृत प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. याखेरीज या लेखकासंबंधी इतरत्र लिहिले गेले आहे ते विद्यार्थ्यांनी वाचावे असे अपेक्षित आहे.

१) कुसुमाग्रज गौरव ग्रंथ - संपा. वा. ल. कुलकर्णी व इतर

२) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - संपा. अ. ना. देशपांडे
खंडे २ यामधील ललित गद्य व वैचारिक निबंध हे लेख.

३) प्रदक्षिणा - संपा. अ. अं. कुलकर्णी, खंड २

४) टिकास्वयंवर - भालचंद्र नेमाडे - यातील कादंबरीवरील सर्व लेख.

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास (प्रारंभ ते १८१८) (M-203) गुण : १००

**उद्दिष्टे :**

१) मराठीच्या आरंभकालापासून इसवी सन १८०० पर्यंतच्या कालखंडातील वेचक गद्य-पद्य साहित्यकृतींचा तपशीलवार अभ्यास करणे.

२) तत्कालीन महत्त्वाचे ग्रंथ, त्यामागील प्रेरणा, ग्रंथकार व ग्रंथविशेष यांचे आकलन करून घेणे व त्याद्वारे सामाजिक परिस्थितीशी साहित्याचा असलेला संबंध अभ्यासणे.

**अभ्यासक्रम :**

या काळातील प्रमुख ग्रंथकार व त्यांच्या साहित्यकृती तसेच या काळात निर्माण झालेल्या वेगवेगळ्या प्रवाहांची व संप्रदायांची चर्चा.

**संदर्भग्रंथ :**


१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - संपा. रा. श्री. जोग/ अ. ना. देशपांडे / ल. रा. नसिराबादकर, आवृत्ती - ८ वी, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) महाराष्ट्र सारस्वत - वि. ल. भावे / ल. रा. पांगारकर

३) प्राचीन मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास - प्र. न. जोशी


## ग्रामीण साहित्य (M-204) गुण : १००

**उद्दिष्टे :**

१) ग्रामीण साहित्याची चळवळ, उगम, स्वरूप व वैशिष्ट्ये यांची चर्चा करणे. या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा तपासणे.

२) ग्रामीण साहित्यांतर्गत झालेली निर्मिती, या साहित्यकृतींचे विषय, आशय व अभिव्यक्ती तपशीलात जाणून घेणे.

**अभ्यासक्रम :**

ग्रामीण साहित्याची चळवळ, उगम, स्वरूप व वैशिष्ट्ये यांची चर्चा

ग्रामीण कथा, कादंबरी, नाटक व कविता यांचा आढावा.

**संदर्भग्रंथ :**


१) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या - आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२) ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव - आनंद यादव

३) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध - नागनाथ कोत्तापल्ले

४) ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास - वासुदेव मुलाटे

५) ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही - वासुदेव मुलाटे

६) ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा - वासुदेव मुलाटे


**मूल्यमापनासंबंधी :**

❒ मूल्यमापन करताना विद्यार्थ्याच्या स्मरणशक्तीऐवजी त्याच्या भाषिक, साहित्यिक व संज्ञापन कौशल्याला अधिक महत्त्व देण्यात येईल.

❒ मूल्यमापनामध्ये विद्यार्थ्याने दिलेल्या माहितीचे प्रमाण व समर्पकता याखेरीज स्वतंत्र विचाराची क्षमता, विचारातील व मांडणीतील स्पष्टता, मांडणीची पद्धती व प्रभाव यांचाही विचार करण्यात येईल.

❑ ❑ ❑